# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

## रोजगार हमी योजनेतून

**मागेल तिला काम, मागेल त्याला काम, मागेल तेव्हा काम, मागेल तितके काम, केलेल्या कामाचे दाम**

- कामाची मागणी ग्राम सेवक, ग्राम रोजगार सेवक यांच्याकडे करायची, मागणी पोच घ्यायची
- काम मागणी केल्यावर १५ दिवसात गावातच काम सुरु
- कामावर मस्टर वर रोज हजेरी
- दर आठवड्याला मोजमाप
- दर पंधरा दिवसाला मजुरी
- मजुरी आपल्या बँक किंवा पोस्टाच्या खात्यावर जमा होते.
- आपले जवळचे पोस्ट आता आपली जवळची बँक झाली आहे.
- पोस्ट बँक खाते हे नवीन खाते झिरो बॅलन्स वर काढता येईल. या खात्यातील रक्कम देणे घेणे हे व्यवहार आपल्या गावातील पोस्टमन आणि शहरातील पोस्टात देखील करता येणार आहे.

### कामाच्या ठिकाणी सुविधा

- सावली
- पिण्याचे पाणी
- प्राथमिक औषध उपचार पेटी
- पाळणाघर
- दर फलक
- नमुना खड्डा

### या योजनेतून गावात- सार्वजनिक लाभाची कामे

१) वनतळे
२) वृक्षलागवड
३) माती नालाबांध
४) गावतलाव
५) ग्रामपंचायतसाठी विहिर
६) रस्ता
७) वृक्षारोपन
८) जंगलातील जाळरेषा
९) क्रीडांगण
१०) भुमीगत बंधारे
११) जलाशयातील गाळ काढणे
१२) कालव्यांचे नुतनीकरण
१३) पडिक (गायरान) जमिनीवर वृक्ष लागवड
१४) बंधारे
१५) रोपवाटीका
१६) रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड
१७) वृक्ष संगोपन
१८) सलग समतल चर
१९) वनबंधारे
२०) सार्वजनिक वनजीमन पट्ट्यांचा विकास

### वैयक्तीक लाभाची कामे

१) सिंचन विहिर
२) रोपवाटीका
३) शोषखड्डा
४) फळबाग
५) व्हर्मी कंपोस्टिंग
६) शेततळे
७) नाडेप कंपोस्टिंग
८) शौचालय
९) वृक्ष लागवड
१०) बांधदुरुस्ती(भातखाचरे)
११) दगडीबांध
१२) घरकुल
१३) सिलिटी
१४) गोठा
१५) कुकुटपालन शेड
१६) सपाटीकरण
१७) वैयक्तिक वनजमिन पट्ट्यांचा विकास



- ग्राम पंचायती मध्ये ग्राम रोजगार सेवक किंवा ग्राम सेवकाकडे नोंदणी करायची
- नोंदणी केल्यावर जॉब कार्ड मिळते
- जॉब कार्ड मजुर कुटुंबाकडे ठेवायचे आहे
- जॉब कार्ड साठी मजुर कुटुंबाला काहीही खर्च नाही
- केलेल्या कामाची किती मजूरी मिळाली
- प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, सदस्य, ग्राम सेवक व ग्राम रोजगार सेवक यांनी महिन्यातून दोनदा रोजगार दिवस भरवायचा आहे. ८ मे शासननिर्णय

प्रगती अभियान

या संबंधी अधिक माहितीसाठी, मागणी नोंदविण्यासाठी व तक्रार नोंदविण्यासाठी टोल फ्री (मोफत) फोन क्र. १८००२२३८३९